# विद्यापीठात आज राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र अधिविभाग, मँग्रोव्ह सोसायटी ऑफ इंडिया व मँग्रोव्ह फाऊंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'खारफुटी व सागरी संपदा' या विषयावर शुक्रवारी (दि. १२) एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी सभागृहात होणाऱ्या परिषदेत प्रा. काथीरेसन, डॉ. सईदा वफार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिषदेत खारफुटी, जैवविविधता, त्यांचे जतन व संवर्धन, संबंधित कायदे आदी विषयांवर व्याख्याने व भित्तिपत्रकांचे सादरीकरण होणार आहे, अशी माहिती परिषदेच्या समन्वयक प्रा. डॉ. एन. एस. चव्हाण यांनी दिली.

# राष्ट्रीय परिषेदेचे आज उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागामार्फत मँग्रोव्ह सोसायटी ऑफ इंडिया व मँग्रोव्ह फौंडेशन मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने 'खारफुटी व सागरी संपदा' या विषयावर १२ एप्रिल रोजी एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे, अशी माहिती परिषदेच्या समन्वयक प्रा. डॉ. एन. एस. चव्हाण यांनी दिली.

वनस्पतीशास्त्र विभागाच्या नीलांबरी सभागृहात होणाऱ्या या परिषदेत प्रा. काथीरेसन, ॲड. सुखटणकर, डॉ. सईदा वफार, प्रा. उंटावळे आदी मान्यवरांची उपस्थिती असेल. यामध्ये परिषदेदरम्यान खारफुटी, जैवविविधता, त्यांचे जतन व संवर्धन, संबंधित कायदे आदी विषयांवर २० व्याख्याने आणि ५० पेक्षा अधिक भित्तीपत्रकांचे सादरीकरण होणार आहे. यासाठी देशातील जवळपास ५० संशोधक, ९० संशोधक विद्यार्थी तसेच १०० हून अधिक पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2019
तरुण भारत



सोळांकूर : पदवीदान करताना ए. वाय. पाटील, आर. वाय. पाटील, डॉ. एस. डी. डेळेकर व इतर.

# सोळांकूरच्या यशवंतराव पाटील कॉलेजमध्ये पदवीदान सोहळा

प्रतिनिधी
सरवडे

सोळांकूर ता.राधानगरी येथील यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालयाचा पहिला पदवी दीक्षांत समारंभ विविध उपक्रमाद्वारे उत्साहात संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. एस.डी.डेळेकर म्हणाले, अल्पावधीतच या कॉलेजने गुणात्मक व संख्यात्मक क्षेत्रातही उत्तुंग भरारी घेतली आहे. या कॉलेजचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असुन याद्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांनीही मन, मनगट व मेंदू यांचा वापर करून आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे. अध्यक्षस्थानावरुन बोलताना संस्थेचे संस्थापक, सचिव ए. वाय. पाटील म्हणाले, दुर्गम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज ओळखुन हे शैक्षणिक संकुल उभे केले असून याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे.

स्वागत प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जी. जी.चौगले यांनी केले. प्रारंभी गावातून ग्रंथदिंडी काढून ध्वज संचलन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे दोनशे विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष सरपंच आर. वाय.पाटील, लक्ष्मण कुमार, डॉ. राहुल पाटील, प्रा.जे.के.चव्हाण, डॉ. संतोष मधाळे, प्रा.अमर पाटील, प्रा.स्वप्निल खोराटे, प्रा.राजेश मेश्राम, विजय पाटील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन डॉ. सुशांत मगदूम यांनी केले तर आभार डॉ. भारती वाली यांनी मानले.